<u>स्पे. दिवाणी दावा क्र.१०९/२०१७ मधील निशाणी १८ वरील आदेश.</u>

(CNR No–MHST05000701–2017)

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी नं.२ यांनी त्यांच्या विरुध्द विनाकैफीयतचा झालेला हुकूम रद्द होवुन कैफीयत दाखल करणेस परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे.

**<u>अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे</u>** –

२. सदरील दावा वादीने प्रतिवादी विरुध्द रक्कम वसुलीसाठी दाखल केला आहे. प्रतिवादी क्र.२ यांना कैफियत देण्यास उशीर झाला आहे. प्रतिवादी क्र.२ हा साखर कारखाना असल्याने त्यांचे गळीत हंगामामुळे तसेच संबंधित विभागातील माहितगार अधिकारी व इसम यांचे कामाचे व्यापामुळे दाव्याबाबतची माहिती व कागदपत्रे जमवणेस वेळ लागला आहे. तसेच, प्रतिवादी क्र.२ हा सहकारी साखर कारखाना असून कोणतेही निर्णय घेताना संचालक मंडळासमोर मिटींगमध्ये ठेवले जातात. कागदोपत्री व तोंडी माहिती मिळविणेस बराच कालावधी लागल्यामुळे वेळेत कैफीयत देता आली नाही. त्यामुळे, त्यांचे विरुध्द विनाकैफीयतचा हुकूम पारीत झालेला आहे. प्रस्तुत प्रतिवादी यांची कैफीयत दाखल करुन घेणे न्यायाचे दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. कैफीयत दाखल न झाल्यास प्रस्तुत प्रतिवादी यांचे अपरिमीत असे नुकसान होणार आहे. अर्जाचे पुष्ठयार्थ प्रतिवादी क्र.२ यांनी शपथपत्र निशाणी १९ वर दाखल केले आहे. सबब, विनाकैफीयतचा झालेला आदेश रद्द होवुन कैफीयत दाखल करुन घेणेचा अर्ज मंजुर करण्याची विनंती प्रतिवादी नं.२ यांनी केली आहे.

३. प्रस्तुत अर्जास वादी यांनी प्रस्तुत अर्जाखाली म्हणणे दाखल करुन विरोध दर्शविला आहे. वादींचे असे म्हणणे आहे की, अर्जातील कथने खोटी व लबाडीची आहेत. प्रतिवादी यांनी झालेल्या विलंबाबाबत दिलेली कारणे अयोग्य आहेत. प्रतिवादी हे कैफियत

देण्यास मुद्दामहुन टाळाटाळ करीत आहेत. सबब, अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे. यदाकदाचित अर्ज मंजुर करावयाचे मे.कोर्टाचे मत झाल्यस सदर प्रतिवादीवर जास्तीत जास्त खर्च आकारुन अर्ज मंजुर करण्यास हरकत नाही असे म्हणणे सादर केले आहे.

४. दोन्ही विद्वान विधीज्ञांचा सविस्तर युक्तीवाद ऐकण्यात आला. युक्तीवादाच्या अनुषंगाने संचिकेचे अवलोकन केल्यास असे दिसुन येते की, प्रतिवादी क्र.२ ही सहकारी संस्था असुन दाव्याचेकामी लागणारी सर्व कागदोपत्री व तोंडी माहिती मिळविणेस बराच कालावधी लागणे साहजिकच आहे. त्यामुळे वेळेत कैफीयत देता आली नाही. प्रस्तुत दावा हा रक्कम वसुल होवुन मिळणेसाठी दाखल केला आहे. त्यामुळे, प्रस्तुत प्रतिवादी यांना त्यांचा बचाव मांडण्याची संधी मिळणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे. तसेच, दावा गुणांगुणावर चालवुन वादी–प्रतिवादी मधील सर्व वादप्रश्न एकाच दाव्यात निकाली काढण्यास न्यायालयासही मदत होईल. प्रस्तुत प्रतिवादी क्र.२ यांना निश्चितच कैफीयत दाखल करण्यास विलंब झालेला आहे. केवळ विलंब झाला आहे म्हणुन कैफीयत नाकारणे न्यायोचित होणार नाही. विलंबासाठी प्रतिवादी क्र.२ यांचेवर खर्च आकारुन 'विना कैफीयत' चा आदेश रद्द करणे न्यायोचित होईल. करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

:: **<u>आदेश</u>** ::

१. अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र.२ यांनी वादींना रक्कम रुपये २००/– खर्च द्यावा. खर्चाची रक्कम जमा झाल्यानंतर प्रतिवादी क्र.२ यांची कैफियत स्वीकारण्यात यावी.




Digitally signed by SAMEERA YASIN DESHMUKH
Date: 2022.08.24 11:05:55 +0530

कराड. ( श्रीमती एस.वाय.देशमुख )

दि.२३/०८/२०२२. दुसरे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, कराड–